
दैनिक अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : १८५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.१६ फेब्रुवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# भारताने पाकला पुन्हा नमवले ! पाकचा धुव्वा !!

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१५, कोलंबो :** भारत आणि पाकिस्तान सामना श्रीलंकेतील कोलंबोमध्ये पार पडला. पाकिस्तानने नाणेफेक जिंकले आणि प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना भारताने १७५ धावा केल्या यालउट पाकिस्तानला ११४ धावा करता आल्या आणि सामना भारताने ६१ धावांनी जिंकला.



टी-२० विश्वचषकात आपला दुसरा साम ना खेळत असलेला अभिषेक शर्मा पुन्हा एकदा चांगली कामगिरी करू शकला नाही आणि शाहीनने एकही धाव न घेता बाद केला, ज्याम ुळे त्याला सलग दुसऱ्या सामन्यात शून्य धाव मिळाली. अभिषेक बाद झाल्यानंतर, इशान किशनची बॅट गर्जना करत होती आणि त्याच्या फलंदाजीमुळे टीम इंडियाने चार षटकांत ३० धावा काढल्या. इशान किशनने पॉवरप्लेमध्ये आपली स्फोटक फलंदाजी सुरू ठेवली, ज्याम ुळे टीम इंडियाने सहा षटकांत एक गडी गमावून ५२ धावा केल्या. सहाव्या षटकात, इशान किशनने २५ चेंडूत पाच चौकार आणि दोन षटकारांसह ४२ धावा काढल्या, तर तिलक वर्मने सात चेंडूत १० धावा काढल्या. भारताने १ बाद ५२ धावा केल्या. इशानने सलग तीन चौकार मारले आणि २७ चेंडूत सात चौकार आणि दोन षटकारांसह त्याचे अर्धशतक पूर्ण केले. इशान किशनने पाकिस्तानी फिरकीपटूंना अडचणीत आणले होते, परंतु डावाच्या नवव्या षटकात, सैम अयुबचा चेंडू मारण्याचा प्रयत्न करताना, त्याने आपली विकेट सोडली आणि तो क्लीन बोल्ड झाला. तोपर्यंत, इशानने ४० चेंडूत ७७ धावा केल्या होत्या, ज्यामध्ये १० चौकार आणि तीन षटकारांचा समावेश होता. तो पुन्हा एकदा शतक गाठण्यात कमी पडला. डावाच्या १२ व्या षटकात, नवाजच्या शेवटच्या चेंडूवर स्वीप शॉट मारण्याचा प्रयत्न करताना, चेंडू त्याच्या पॅडवर आदळला. त्यानंतर जोरदार अपील करण्यात आले, परंतु पंचांनी त्याला बाद घोषित केले. पाकिस्तानने रिव्ह्यू घेतला आणि पंचांच्या निर्णयामुळे सूर्यकुमार बाद होण्यापासून वाचला. भारताने १२ षटकांत १०८ धावा केल्या होत्या.

डावाच्या १५ व्या षटकात गोलंदाजी करण्यासाठी आलेल्या सैम अयुबने दुसऱ्याच चेंडूवर तिलक वर्माला बाद केले. त्यानंतर, उत्कृष्ट फॉर्ममध्ये असलेल्या हार्दिक पंड्या फलंदाजीला आला आणि पहिल्याच चेंडूवर षटकार मारून बाद झाला. इशान किशनच्या बाद झाल्यानंतर, सूर्यकुमार यादव आणि तिलक वर्मा सामन्याचा वेग कमी झाला. दोघांपैकी कोणीही चौकार मारू शकले नाही. भारताने १४ षटकांत दोन विकेट गमावत १२५ धावा केल्या. सूर्याने १७ चेंडूत २१ धावा केल्या, तर तिलकने २३ चेंडूत २५ धावा केल्या.

**भारताने १७५ धावा केल्या !**

भारत विरुद्ध पाकिस्तान लाईव्ह स्कोअर: पाकिस्तानचा कर्णधार सलमान आघा यांनी शेवटचा षटक शाहीनला दिला आणि रिंकू सिंगने आत येताच एक चौकार आणि एक षटकार मारला. तर दुबेने पहिल्याच चेंडूवर चौकार मारला. परिणामी, भारताने शेवटच्या षटकात १६ धावा केल्या आणि दोन विकेट गमावल्या. यामुळे टीम इंडियाने पाकिस्तानसम ोर १७६ धावांचे लक्ष्य ठेवले. तर रिंकूने अखेर चार चेंडूत एक चौकार आणि एक षटकार मारून ११ धावा केल्या.

श्रीलंकेच्या मंद विकेटवर उस्मान तारिक विरुद्ध पूर्ण ताकदीने खेळणारा सूर्यकुमार यादव चेंडू सीमा ओलांडून पाठवू शकला नाही. परिणामी, तो २९ चेंडूत तीन चौकारांसह ३२ धावा करून बाद झाला आणि १५९ धावांवर भारताला पाचवा धक्का बसला. श्रीलंकेचा प्रेमदासा विकेट हळूहळू मंदावला आणि परिणामी, टीम इंडियाचे फलंदाज चौकार मारू शकले नाहीत. परिणामी, भारताने १७ षटकांत चार विकेट गमावून १४० धावा केल्या. १० षटकांत ९२ धावा करणाऱ्या भारताला पुढील सात षटकांत फक्त ४८ धावा करता आल्या आणि दोन विकेट गमावल्या.

जसप्रीत बुमराहचा पहिला चेंडू अयुबच्या बॅटला लागला आणि तो विकेटकीपरच्या मागे षटकार मारला. त्यानंतर त्याने एक प्राणघातक यॉर्कर काढला, पाकिस्तानने सहा धावांत दोन विकेट गमावल्या. हार्दिकच्या पहिल्या षटकाच्या चौथ्या चेंडूवर फरहानने मोठा शॉट खेळण्याचा प्रयत्न केला, परंतु हार्दिकने एकही धाव घेतली नाही आणि त्याने मेडन विकेट टाकली. पहिल्या १० षटकांमध्ये भारताने २ गडी बाद ९२ धावा लवकर केल्या. त्यानंतर, शेवटच्या १० षटकांमध्ये टीम इंडियाने स्लो विकेटवर ८३ धावा केल्या आणि पाच विकेट गमावल्या. डावच्या ५ व्या षटकात अक्षर पटेलने टाकलेल्या दोन चेंडूंवर उस्मानने दोन चौकार मारले. एक धाव घेतल्यानंतर, त्याने बाबर आझमला स्ट्राईक दिला, परंतु अक्षरच्या इन-स्विंगिंग चेंडूने तो क्लीन बोल्ड झाला. यामुळे पाकिस्तानची चौथी विकेट ३४ धावांवर पडली.

# कसारा मनमाड तिसऱ्या आणि चौथ्या रेल्वे मार्गाला केंद्र सरकारची मंजुरी

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१५, मुंबई :** कसारा मनमाड तिस-या आणि चौथ्या रेल्वे मार्गिकेला केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे. १३१ किमीचा हा प्रकल्प असून त्यासाठी १० हजार १५४ कोटींच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. या प्रकल्पात २८ किमी लांबीचे पाच बोगदे असतील. २४ किमी लांबीचा सर्वात लांब बोगदा याच मार्गावर असेल.



मंत्रिमंडळाने १ लाख ६९ हजार कोटी रुपयांचे निर्णय घेतले. तीन रेल्वे प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. कसारा मनमाड १४३ किमी लांबीचा रेल्वे म ार्ग. त्यात २८ किमी लांबीचे ५ बोगदे आहेत.२४ किमी लांबीचा सर्वात लांब बोगदा याच मार्गावर असेल.

कसारा - मनमाड तिसरी आणि चौथी लाईन यासह दिल्ली - अंबाला तिसरी आणि चौथी लाईन, बल्लारी - होसापेत तिसरी आणि चौथी लाईन यांना देखीस मंजुरी देण्यात आली. वाढलेल्या लाईन क्षमतेमुळे गतिशीलता लक्षणीयरीत्या वाढेल, ज्यामुळे भारतीय रेल्वेची कार्यक्षमता

## महाराष्ट्रा सर्वात मोठा रेल्वे प्रकल्प !

आणि सेवा विश्वासार्हता सुधारेल. हे बहु-ट्रॅकिंग प्रस्ताव कामकाज सुलभ करण्यासाठी आणि गर्दी कमी करण्यासाठी सज्ज आहेत. हे प्रकल्प पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या नवीन भारताच्या दृष्टिकोनाशी सुसंगत आहेत जे या भागातील लोकांना या क्षेत्रातील व्यापक विकासाद्वारे आत्मनिर्भर बनवेल ज्यामुळे त्यांच्या रोजगार/स्वयंरोजगाराच्या संधी वाढतील.

दरम्यान हे प्रकल्प एकात्मिक नियोजन आणि भागधारकांच्या सल्ल्याद्वारे बहु-मॉडेल कनेक्टिव्हिटी आणि लॉजिस्टिक कार्यक्षमता वाढविण्यावर लक्ष केंद्रित करून पंतप्रधान-गति शक्ती राष्ट्रीय म ास्टर प्लॅनवर नियोजित आहेत. हे प्रकल्प लोक, वस्तू आणि सेवांच्या वाहतुकीसाठी अखंड कनेक्टिव्हिटी प्रदान करतील. प्रस्तावित मल्टी-ट्रॅकिंग प्रकल्पामुळे सुमारे ९७ लाख लोकसंख्या असलेल्या सुमारे ३९०२ गावांना रेल्वेने जोडणी दिली जाईल.

प्रस्तावित क्षमता वाढीमुळे भावली धरण, श्री घाटणदेवी, त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग, श्री माता वैष्णोदेवी कटरा/श्रीनगर आणि हंपी (युनेस्को जागतिक वारसा स्थळ), बल्लारी किल्ला, दारोजी स्लॉथ बेअर अभयारण्य, तुंगभद्रा धरण, केंचनगुड्डा आणि विजया विठ्ठल मंदिर इत्यादी प्रमुख आकर्षणांसह देशभरातील अनेक प्रमुख पर्यटन स्थळांशी रेल्वेने जोडले जाईल.

प्रस्तावित प्रकल्प कोळसा, पोलाद, लोहखनिज, सिमेंट, चुनखडी/बॉक्साइट, कंटेनर, अन्नधान्य, साखर, खते, पीओएल इत्यादी वस्तूंच्या वाहतुकीसाठी आवश्यक मार्ग आहेत. क्षमता वाढीच्या कामांमुळे ९६ एमटीपीए (प्रतिवर्षी दशलक्ष टन) अतिरिक्त मालवाहतूक होईल. रेल्वे पर्यावरणपूरक आणि ऊर्जा कार्यक्षम वाहतुकीचे साधन असल्याने, हवामान उद्दिष्टे साध्य करण्यात आणि देशाचा लॉजिस्टिक्स खर्च कमी करण्यात, तेल आयात (२२ कोटी लिटर) कमी करण्यात आणि CO2 उत्सर्जन (१११ कोटी किलो) कमी करण्यात मदत करेल जे ४ कोटी झाडे लावण्याइतके आहे.

# पोलीस भरतीचा सराव करताना आक्रित घडलं, आई-वडिलांचा एकुलता एक लेक गेला

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.१५, बुलढाणा :** राज्यात बहुतांश ठिकाणी सध्या पोलीस भरती प्रक्रिया सुरू आहे. सोबतच याकरिता सराव देखील म ोठ्या प्रमाणात करावा लागत आहे. मात्र, बीड पाठोपाठ बुलढाण्यात देखील एका तरुणाचा भरती प्रक्रिया दरम्यान किंबहुना त्याची तयारी करत असताना मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर तालुक्यातील सारशिव येथे भरतीची तयारी करणाऱ्या एका तरुणाचा १२ फेब्रुवारी रोजी दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडल्याने सर्वत्र शोककळा पसरली आहे.

**आई-वडिलांचा आक्रोश !**

साल्शू येथील दीपक रामदास जाधव (वय १९) याचा रनिंगचा सराव करताना अचानक छाती त्रास झाल्यानं मृत्यू झाला. मुंबई येथे त्याची १३ फेब्रुवारी रोजी ग्राउंड चाचणी असल्याने तो सारशिव फाटा येथे मंगळूर नवघरे परिसरात पूर्वतयारीसाठी सराव करण्यास गेला होता. धावत असताना अचानक प्रकृती बिघडल्याने त्याला तात्काळ मदत करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, त्याचा मृत्यू झाल्याचं स्पष्ट झालं या घटनेमुळे साल्शू गावासह मित्रपरिवारावर शोककळा पसरली आहे. दीपक हा आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा होता. त्याच्या पश्चात आई, वडील व दोन बहिणी असा परिवार आहे.

# द्वारका-नाशिकरोड दहा पदरीकरणासाठी २४४ कोटींची निविदा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, नाशिक :** सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर द्वारका सर्कलवरील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी अंडरपास मंजूर झाल्यानंतर आता द्वारका ते नाशिकरोड या आठ किलोमीटर लांबीच्या दहापदरी रस्त्यालाही केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्रालयाने मंजुरी दिली आहे. त्यामुळे द्वारकासह या महामार्गावरील वाहतूक कोंडीही फुटणार आहे.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या (न्हाई) सूचनेनुसार 'व्हाइट टॉपिंग' ऐवजी डांबरीकरणाचा २४४ कोटींचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्याला 'न्हाई' ने मंजुरी दिल्यानंतर आता महापालिकेकडून या कामाची निविदा प्रक्रिया सुरू करण्याची तयारी सुरू झाली आहे. त्यामुळे सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर द्वारका सर्कलपाठोपाठ द्वारका ते नाशिकरोड महामार्गावरील वाहतूक कोंडीही फुटणार आहे. स द्वारका येथून पुण्याकडे जाणाऱ्या महामार्गावरून नाशिकरोड, सिन्नर, शिर्डीकडे मोठ्या प्रमाणावर वाहने जातात. हा रस्ता शहरातील सर्वाधिक वाहतुकीचा आहे. परिणामी द्वारका चौक ते दत्त मंदिर सिग्नल यादरम्यान वारंवार वाहतूक कोंडी होते. त्यामुळे चार वर्षांपूर्वी भारतमाला योजनेअंतर्गत द्वारका ते दत्त मंदिर उड्डाणपूल मंजूर करण्यात आला होता. परंतु, निओ मेट्रोमुळे हा उड्डाणपूल अडचणीत आला होता. आता केंद्राने निओ मेट्रो प्रकल्पावरही फुली मारली आहे. त्यामुळे डबलडेकर पूल रद्द झाल्याने महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांनी या मार्गाच्या रस्ता रुंदीकरणाचा प्रस्ताव 'न्हाई'कडे सादर केला होता. २७६ कोटी खर्चुन दहापदरी रस्त्याचा प्रस्ताव 'न्हाई'कडे सादर झाला होता. त्याबाबत मंगळवारी 'न्हाई' सोबत महापालिकेच्या अधिकाऱ्यांची दिल्लीत बैठक पडली. त्यात 'न्हाई'ने 'व्हाइट टॉपिंग' ऐवजी रस्ता डांबरी असावा अशा सूचना करीत फेरप्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार महापालिकेच्या बांधकाम विभागाने २४४ कोटींचा फेरप्रस्ताव सादर केल्यानंतर 'न्हाई'ने या कामाला हिरवा कंदील दर्शवला आहे. त्यामुळे या कामासाठीची निविदा प्रक्रिया राबविण्यास प्रारंभ झाला आहे.

# कुख्यात शुटर सह अन्य १ साथीदार अटकेत ; ३ घरफोड्याचे गुन्हे

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१५, चंद्रपूर :** स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर यांनी धडक कारवाई करत रेकॉर्डवरील आरोपी सरफरोज उर्फ शुटर याच्यासह एका साथीदाराला अटक करून पो. स्टे. रामनगर हद्दीतील तीन घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणले. आरोपींकडून सुम ारे १९ लाख ६९ हजार ५०० रुपयांचा सोन्या-चांदीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

१४ फेब्रुवारी २०२६ रोजी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशान्वये चंद्रपूर शहरात प्रोव्हिजन, जुगार रेड, मोटारसायकल चोरी व घरफोडी गुन्ह्यांतील आरोपींची तपासणी करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करत होते. दरम्यान, गोपनीय माहितीदाराकडून मो. सरफरोज सगीर शहा (वय २५), रा. आमटे लेआउट, रयतवारी कॉलरी, चंद्रपूर याने रामनगर पोलीस ठाणे हद्दीतील इंदिरानगर परिसरात घरफोडी केल्याची माहिती मिळाली.

माहितीच्या आधारे पथकाने आरोपीचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेतले. तसेच सद्दाम मुस्ताक शेख (वय ३०), रा. बँक ऑफ इंडिया मागे, घुग्घुस, ता. जि. चंद्रपूर यालाही अटक करण्यात आली. चौकशीदरम्यान दोन्ही आरोपींनी राम नगर पोलीस ठाणे हद्दीतील इंदिरानगर, कृष्णानगर व शामनगर परिसरात तीन ठिकाणी घरफोडी केल्याची कबुली दिली. त्यावरून आरोपींकडून गुन्ह्यात चोरी गेलेले सोन्याचे व चांदीचे दागिने असा एकूण १९ लाख ६९ हजार ५०० रुपयांचा माल जप्त करण्यात आला असून तीन घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. पुढील




तपासासाठी दोन्ही आरोपींना रामनगर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या पोउपनि विनोद भुरले, पोउपनि सुनिल गौरकार, पोहवा सुभाष गोहोकार, पोहवा सतिश अवथरे, पोहवा रजनिकांत पुठ्ठावार, पोहवा दिपक डोंगरे, पोहवा इम्रान खान, मपोहवा विजयमाला वाघमारे, मपोहवा निराशा तितरे, पोअं हिरालाल गुप्ता, पोअं किशोर वाकाटे, पोअं शशांक बदामवार यांनी केली आहे.

# आर.आर.पाटील



राजकारणातील अजातशत्रू व्यक्तिमत्व अशी ओळख असलेले निष्कलंक चारित्र्याचे माजी उपमख्यमंत्री रावसाहेब राजाराम पाटील उर्फ आर आर पाटील यांचा आज स्मृतिदिन. आजच्याच दिवशी म्हणजे १६ फेब्रुवारी २०१५ रोजी आर आर पाटील यांचे अल्पशा आजाराने निधन झाले होते. आर आर पाटील यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला होता. आर आर पाटील म्हणजे राजकारणातील आम आदमी. शेतकरी असोत की सर्वसामान्य नागरिक, गरीब असोत की वंचित प्रत्येकाला आर आर पाटील आपले वाटत होते. राजकारणात उपमुख्यमंत्री पदासारख्या मोठ्या पदापर्यंत पोहचूनही कायम जमिनीवर राहून जनतेशी नाळ टिकवलेले आर आर पाटील सर्वसामान्यांचे नेते होते म्हणूनच त्यांना सर्वसामान्य नागरिक त्यांना प्रेमाने आबा म्हणत. १६ ऑगस्ट १९५७ रोजी सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील अंजनी गावात एका गरीब शेतकरी कुटुंबात आबांचा जन्म झाला. घरची परिस्थिती गरिबीची असल्याने आबांनी कमवा आणि शिका या योजनेतून शिक्षण घेतले. बी ए झाल्यानंतर त्यांनी एलएलएलबी चे ही शिक्षण घेतले. कॉलेज जीवनातच त्यांनी शेतकऱ्यांचे, सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न शासन दरबारी मांडायला सुरुवात केली. त्यांच्यातील नेतृत्व गुण वसंत दादा पाटलांनी हेरले आणि त्यांना राजकारणात आणले. कोणतीही राजकीय पार्शवभूमी नसताना समाजासाठी काहीतरी करण्याची जिद्द, मनाला भिडणारी भाषण शैली आणि स्वच्छ प्रतिमेच्या जोरावर त्यांनी अल्पावधीतच राजकारणात बस्तान बसवले. १९७९ साली पहिल्यांदा जिल्हा परिषद सदस्य म्हणून आबा निवडून आले. १९७९ ते १९९० असे एकवीस वर्ष आबा जिल्हा परिषद सदस्य होते. १९९० साली आबांनी पहिल्यांदा विधानसभेची निवडणूक लढवली आणि प्रचंड मतांनी जिंकली. त्यानंतर २०१४ पर्यंतच्या विधानसभेच्या सर्व निवडणुका आबांनी जिंकल्या. १९९५ साली आबा दुसऱ्यांदा आमदार झाल्यावर राज्यात युतीचे सरकार आले. विरोधी पक्षात असलेल्या आबांनी राजकीय आयुधांचा वापर करून अनेकदा सत्तधाऱ्यांना कोंडीत पकडले. विरोधी पक्षात असूनही आबांनी विधानसभा गाजवून सोडली. १९९९ साली राष्ट्रवादीची स्थापना झाल्यावर ते राष्ट्रवादीत आले. शरद पवार यांचे अत्यंत विश्वासू साथीदार अशी त्यांची ओळख बनली. त्यांनीही राष्ट्रवादी घराघरात पोहचवण्यासाठी जीवाचे रान केले. ते काही काळ राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्याचे अध्यक्ष होते. राज्य मंत्रिमंडळात त्यांना अनेक महत्वाची पदे मिळाली. आर आर पाटील ग्रामविकास मंत्री असताना त्यांनी संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान यशस्वीपणे राबवून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. पुढे राज्याचे गृहमंत्री आणि उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारीही त्यांनी स्वीकारली. गृहमंत्री असताना त्यांनी राज्यातील डान्स बार बंद करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. डान्स बार बंद करण्याचा त्यांच्या निर्णयाला कडाडून विरोध झाला पण ते आपल्या निर्णयावर ठाम राहिले. गृहमंत्री असतानाच त्यांनी महात्मा गांधी तंटामुक्ती अभियान राबवले. गृहमंत्री असताना त्यांनी खाजगी सावकारी विरूध्दही दंड थोपटले होते तसेच त्यांनी गुटखा बंदी करण्याचा देखील निर्णय घेतला होता. त्यांच्या याच धडाकेबाज निर्णयांनी त्यांनी सर्वसामान्यांच्या मनात आदराचे स्थान निर्माण केले होते. गृहमंत्री, उपमुख्यमंत्री अशी मोठी पदे भूषवूनही आबांनी तळागळातील कार्यकर्त्यांशी असलेला संवाद तुटू दिला नाही. सत्ता येते आणि जाते जोडलेले माणसे टिकवली पाहिजेत हे आबांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. उच्च पदावर पोहचूनही आबांनी आपला साधेपणा कायम ठेवला. इतक्या मोठ्या पदावर असतानाही आबांनी आपल्या पाल्यांना महागड्या इंग्रजी शाळेत न घालता जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत घातले होते. आबांसारखे तळागळातून आलेले स्वच्छ चारित्र्याचे निष्कलंक, अजातशत्रू व्यक्तिमत्व राजकारणात विरळच. सध्याच्या गढूळ राजकीय वातावरणात तर आबांसारख्या निष्कलंक चारित्र्याच्या नेत्याची आवर्जून आठवून येते. राजकारणात त्यांनी जो आदर्श घालून दिला आहे त्याचे अनुकरण आजच्या राजकीय नेत्यांनी केले तरच राजकीय नेत्यांवरील जनतेचा उडालेला विश्वास पुन्हा प्राप्त होईल. आबांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**

# महाराष्ट्राची रांगडी कोल्हापुरी चप्पल..!!

एखाद्या व्यक्तीच्या पेहरावाबरोबरच पादत्राणेसुद्धा आता खूप महत्त्वाची झाली आहेत. एकेकाळचा पादत्राणे हा तसा दुर्लक्षित विषय. पायात काहीबाही घालून सहज कामावर निघून जाणे खपून जायचे. आता मात्र काळ बदलला आहे, पादत्राणे हीसुद्धा एखाद्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख म्हणून ग्राह्य धरली जाऊ लागली आहे. रणरणत्या उन्हात आपल्या पायांना संरक्षण मिळावे म्हणून पायाच्या तळव्यांवर झाडाची पाने किंवा जाड साली बांधून मानवाने पादत्राणे तयार करायला सुरुवात केली.

पुढे मेलेल्या जनावरांच्या चामड्याचा उपयोग पायाच्या तळव्यांना खडी आणि काटे टोचू नयेत तसेच उन्हापासून बचाव करण्यासाठी बांधून चामड्याच्या चपलेची मुहूर्तमेढ झाली. चपला बनवण्यासाठी विशिष्ट कारागीर आपले कसब दाखवत आपापल्या प्रांतामध्ये पादत्राणे तयार करू लागले व त्यांच्या कलाकुसरीनुसार त्यांच्या चपलांकरिता मागणी वाढली. त्याचप्रमाणे या कारागीरांच्या प्रांतानुसार त्यांच्या चपलांना त्यांच्या प्रांताचे नाव जोडले गेले. कोल्हापुरी चपलेचा इतिहाससुद्धा अगदी तसाच आहे. बाराव्या शतकामध्ये कोल्हापूरमध्ये या व्यवसायाला त्यावेळच्या राजांनी प्रोत्साहन दिले. तेराव्या शतकात कोल्हापुरी चपला ही एक वेगळी ओळख सर्वदूर पसरली. कोल्हापूरचे प्रथम शाहू महाराज आणि त्यांचे उत्तराधिकारी यांनीसुद्धा या चपला तयार करणाऱ्या कारागीरांना प्रोत्साहन दिले व चपला तयार करण्याच्या कारखान्यांची विविध केंद्रे कोल्हापुरात सुरू झाली.

पूर्वीच्या मराठी सिनेमांमध्ये एखादे रांगडे व्यक्तिमत्त्व दाखवताना त्यांच्या पायात कोल्हापुरी चप्पल असे. 'कर्र... कर्र' असा आवाज करणाऱ्या चपला घालून एखादे पात्र सर्वांचे लक्ष वेधून घेत असे. गावचे पाटील, गावातील प्रतिष्ठित व्यक्ती यांच्या पायातील कोल्हापुरी वहाणा ही त्यांची व्यक्तिमत्त्वेचे रंगवताना एक महत्त्वाची वस्तू असे. मराठी चित्रपटसृष्टीतील चंद्रकांत आणि सूर्यकांत मांढरे या रांगड्या आदरणीय कलाकार व्यक्तिमत्त्वांच्या पायातील कोल्हापुरी चपला त्यावेळच्या तरुणाईचे आकर्षण ठरल्या. कोल्हापुरी चपला या तशा खूपच मजबूत. बऱ्याचदा एखाद्यावरील






राग काढताना तुला चपलेनी फोडून काढीन, माझ्या पायातलं कोल्हापुरी पायतान पाहिलंस का? अशी वाक्यं वापरात असायची. आज काळ पुढे सरकला आणि पादत्राणे प्रकारात अनेक कंपन्या पुढे आल्या. चामड्याचा तुटवडा आणि नव्या पिढीची बदललेली मागणी यामुळे कोल्हापुरी चपलांची आवक काही प्रमाणात कमी झाल्याचेसुद्धा काही व्यापारी सांगतात, परंतु काही व्यापारी त्याच्या अगदी उलट सध्या तरुणाईला कोल्हापुरी चपलांचे वेड लागले आहे व जगभर आमच्या चपलांना मागणी असल्याचे आवर्जून सांगतात. २०१९ च्या जुलैमध्ये कोल्हापुरी चपलांना जिओ टॅग पेटंट मिळाले. त्यामुळे अशा प्रकारची चप्पल बनवणाऱ्या कोल्हापूरजवळच्या इतर गावांमधील चपलांनासुद्धा आता 'कोल्हापुरी चप्पल' असा टॅग लावून त्या सर्वांना उपलब्ध होत आहेत.

कोल्हापुरी चप्पल तयार करण्यासाठी लागणारे चामडे किंवा चपलांचे रंग हे नैसर्गिक भाजीपाला वापरून तयार केले जातात. पूर्णतः हाताने तयार केलेली ही चप्पल मध्यभागी पायाला घट्ट धरणारा चामड्याच्याच डिझाइनचा पट्टा, तर अंगठ्यापासून त्या रुंद पट्ट्याला जोडलेली चामड्याच्या वेणीची पट्टी. पायाच्या अंगठ्याला

पद्धतीमध्येसुद्धा आमूलाग्र बदल होत आहेत. नवनवीन यंत्रसामुग्रीचा उपयोग चप्पल तयार करण्यासाठी होत आहे. पूर्वी एक चप्पल करण्यासाठी किमान चार आठवडे लागायचे. पण आज ती चप्पल विविध यंत्रे वापरून लवकर तयार करता येते. फिनिशिंगसाठीसुद्धा आता मशीनचा वापर केला जातो. सध्या या व्यवसायात चामड्याची टंचाई असल्यामुळे निर्मितीमध्ये खूपच घट झाली आहे. त्याचप्रमाणे चामड्याच्या किमतीसुद्धा आता वाढल्या आहेत. देशात आणि परदेशात होणाऱ्या विविध कला प्रदर्शनांमधून अनेक स्टॉल लागतात आणि त्यामध्ये कोल्हापुरी चपलेचा स्टॉल हा एक वेगळे आकर्षण असतो. स्वित्झर्लंड, अमेरिका, युरोप, इजिप्त, इटली व इतरही अनेक देशांमधून कोल्हापुरी चपलांना खूप चांगली पसंती आहे.

एखाद्या व्यक्तीचे साधे किंवा ग्रामीण भागातील व्यक्तिमत्त्व उभे करण्यासाठी कोल्हापुरी चपलांची निवड केली जाते. दिल्लीमध्ये महाराष्ट्रातील नेते जेव्हा आपल्या मिश्यांवर ताव मारतात, तेव्हा महाराष्ट्रीय बाणा दाखवणारा त्यांच्या चपलांमधून महाराष्ट्राचा स्वतःच्या अस्सल पेहरावासोबत पादत्राणांचीही ओळख आहे. 'कोल्हापुरी चप्पल' ही महाराष्ट्राची रांगडी ओळख तिच्यातील खास वैशिष्ट्यांमुळे सर्वदूर पसरलेली आहे.

महाराष्ट्राची रांगडी कोल्हापुरी चप्पल योग्य पकड देणारी पट्टी आणि मधल्या पट्टीवर रुबाबदार असा गोंडा. चपलांच्या उंचीमध्ये सध्या विविधता पाहायला मिळते. जसे काही ग्राहक हे त्यांना टाचा उंच हव्या आहेत व त्याप्रमाणे ते कारागीराकडे तशा पद्धतीच्या चपलांची मागणी करतात. काही ग्राहक कोल्हापुरी कर्र कर्र आवाज करणारी चप्पल द्या अशा पद्धतीनेच मागणी करतात. कोल्हापुरी चपलांना पूर्वी 'कर्र कर्र' आवाज येतो. या नेत्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक रुबाबदार होते जेव्हा ते अंगावर कडक खादीचे कपडे आणि पायात कोल्हापुरी चपलांचा साज चढवतात 'खास कोल्हापुरी', 'खास कुरुंदवाडी', 'खास कापशी', 'गांधीवादी' अशी नावेसुद्धा वापरली जात. हिंदी चित्रपटसृष्टीतील काही नावाजलेल्या चित्रपटांची नावेसुद्धा काही कारागीरांनी आपल्या चपलांना दिली. जसे गाजलेले चित्रपट 'सुरक्षा', 'सिलसिला', 'सुहाग', 'जंजीर', 'नाचे मयुरी', 'दिल', 'मेरी आवाज सुनो', 'महाराजा', 'महाभारत' इत्यादी.

कोल्हापुरी चप्पल पूर्णतः चामड्याची असल्यामुळे उन्हाळ्यात जमिनीपासून येणारी उष्णता ती रोखून धरते. सपाट कोल्हापुरी चपलांना देशात आणि परदेशात खूप मागणी आहे. जसजशी नवीन पिढी या व्यवसायात प्रवेश करत आहे तसतसे यातील कामाच्या पुरुषांसाठी, स्त्रियांसाठी आणि लहान मुलांसाठीसुद्धा वेगवेगळ्या डिझाइनमध्ये कोल्हापुरी चपला उपलब्ध आहेत. कोल्हापूरला जाणारा प्रत्येकजण स्वतःसाठी व कुटुंबातील इतर सदस्यांसाठी कोल्हापुरी चपला आवर्जून खरेदी करतो. प्रत्येक राज्याची स्वतःची काहीतरी वेगळी ओळख आहे. त्या-त्या राज्यांनी त्यांच्या पोशाख आणि पादत्राणे याबाबत तडजोड केलेली दिसत नाही. राजस्थानातून किंवा गुजरात, मध्य प्रदेश येथून आलेले अनेक पोशाख व पादत्राणे महाराष्ट्रातील विविध विवाह सोहळे आणि कार्यक्रमांमध्ये मिरवताना दिसतात. महाराष्ट्राचा शाही फेटा, पेहराव आणि महाराष्ट्राचे वैभव असणाऱ्या 'कोल्हापुरी चपले'चा नवीन पिढीने आवर्जून वापर सुरू करावा. महाराष्ट्राचा पेहराव आणि पादत्राणांची ही ओळख पुन्हा एकदा उदयाला यावी.

'कोल्हापुरी चप्पल' ही तर आपल्या राज्याची ओळख म्हणून प्रत्येकाने अवश्य परिधान करावी. कोल्हापुरी चपलांना पुन्हा एकदा सुवर्णवैभव प्राप्त व्हावे आणि या पादत्राणांची उलाढाल जगभर व्हावी हीच सदिच्छा... !!

## नवीन वादळे

अस्वस्थतपासयंत्रणा
भयानकवार्ता आदळे
उडतो पाला पाचोळा
सुटतात नवीन वादळे

कशीतीचं ती चौकशी
जखमा पुन्हा भळभळे
पुन्हापुन्हा सांगू घटना
कसेचित्र होईलं वेगळे

क्लिष्ट ती तपास कामे
मुक्ताफळे कुणी उधळे
गहाळहोई पुरावे जिथे
अधिकारकसले वेंधळे

निष्कर्षांप्रतीपोचताना
दिशा पुन्हा का गोंधळे
कुठून आलायं आदेश
उलट पाऊली का वळे

पीठ पळवतो कुणीतर
दळत राहतात आंधळे
कणसेकधीचं करपली
निसटूनि पडले जोंधळे

आग केव्हांच धुमसली
स्पोटके सगळी सादळे
काय लागणार हाताला
दगडावर मारुन कुदळे

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

## मुगाव जि.प.प्राथमिक शाळेत मातृ-पितृ दिन साजरा



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, दौंड :** सामाजिक व सांस्कृतिक बांधिलकीचे यथार्थ दर्शन घडवीत जिल्हा परिषद शाळा मुगाव येथे मातृ-पितृ दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आई-वडिलांचे पाय धुवून त्यांचे पूजन केले. यावेळी सर्वजण भाऊक झाले होते. संस्काराची खरी शिदोरी गावातील शाळेतच दिली जाते असे प्रतिपादन सर्व महिला पालकांनी केले. प्रगतीच्या नावाखाली पाश्चात्य संस्कृतीचा अंगीकार केला जात आहे, संस्कृतीचा ऱ्हास होत आहे. त्यामुळे शाळेत अभ्यासक्रमाबरोबरच सर्व मूल्यांची रुजवणूक व्हावी यासाठी या उपक्रमाचे नियोजन केले. याप्रसंगी मुलांचे आई-वडील, आजी आजोबा हे सर्वजण मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा अविस्मरणीय कार्यक्रम सर्वांनी मिळून साजरा केला. याप्रसंगी शाळा प्रेमी नागरिक संदीप घोलप यांनी सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेतील शिक्षिका रूपाली शिंदे, मुख्याध्यापक दत्तात्रय शिंदे यांनी मेहनत घेतली. याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महेश बागल यांनी सर्व उपस्थित पालकांचे आभार मानले तर केंद्राच्या केंद्रप्रमुख वैशाली जानराव यांनी याप्रसंगी सर्व पालकांना मार्गदर्शन केले.

# शिक्षणा शिवाय माणसाला तरणोपाय नाही...

केरळ भारतातील लहान राज्य, त्यांचा अर्थसंकल्प मुंबई महानगरपालिका अर्थसंकल्पापेक्षा कमी असे नेहमीच जाहीर सभांमधून नेते तुलना करून सांगतात. अर्थसंकल्प तुलनेत कमी असला तरी केरळचे विकासाचे संकल्प वाखाणण्याजोगी आहेत.केरळ मधील नागरिकांची मेहनत, जिद्द आणि चिकाटी राज्याच्या लौकिकाला साजेशी आहे.

केरळ राज्याने पदवी शिक्षण मोफत देण्याची घोषणा केली. या निर्णयाचे देशभरात कौतुक केले जात आहे. शिक्षणा शिवाय माणूस उभाच राहू शकत नाही. खाजगी शिक्षण संस्थांच्या विळख्यात अडकलेला मध्यमवर्गीय कर्जाच्या ओझ्याने दबला आहे. शिक्षणासाठी कर्ज, नोकरीसाठी संघर्ष आणि आयुष्यभर कर्जाची परतफेड हे सामान्य माणसाचे द्रुष्टचक्र बनले आहे. केरळ राज्याचा निर्णय हे द्रुष्टचक्र तोडण्याचा प्रयत्न आहे. शिक्षण मोफत असेल तर तरुण अधिक निर्भय होतील, नवे संशोधन, नव्या कला आत्मसात करतील.नव्या संकल्पनांकडे वळतील, त्यानंतर समाजकल्याण, समाजसेवा क्षेत्राकडे पाहतील. स्वत: सक्षम असतील तर दुसर्याच्या मदतीला धावून येतील. केरळ राज्य भारतातील सर्वाधिक साक्षरता दर, आरोग्य निर्देशांक, स्त्रि- पुरुष समानता, सार्वजनिक आरोग्य व्यवस्था या सगळ्यांमध्ये आघाडीवर आहे.

आमच्या राज्यात जातीपातीच्या भिंती उभ्या, लाडक्या बहिणीच्या योजना, मोफत शिधावाटप, वाहतूकीच्या एस.टी. प्रवासात अर्धे भाडे सवलत अशा योजनांचा सुळसुळाट. यातून माणूस आळशी झाला. रस्ते,पूल, पुतळे, नामांतरणे अशा विषयांवर चर्चा करण्यात आघाडीवर. केरळ राज्याने' मानव विकास' ही संकल्पना केवळ कागदावरच नाही तर धोरणात आणि कृतीत आणली आहे. आज देशात शिक्षण सेवा न राहता एक महागडी वस्तू बनली आहे. शाळा म्हणजे व्यवसाय, कॉलेज म्हणजे कॉरपोरेट संस्था आणि पदवी म्हणजे नोकरी मिळवण्याचे साधन अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. गरीब, कष्टकरी, शेतकरी, आदिवासी, ललित,



अल्पसंख्याक यांच्यासाठी शिक्षण अजूनही स्वप्नच आहे. मात्र, केरळ राज्यांने यावर मात करून माणूस घडवणारा निर्णय घेतला आहे. देशातील लाखो तरुण पी एच डी शिक्षण परदेशात जाऊन घेत आहेत. भारतार शैक्षणिक क्रांती कधी घडेल काय अशा आशेवर लाखो पालक चातक पक्षाप्रमाणे टक लावून पाहत आहेत.

**- महादेव गोळवसकर**
**मुंबई, ९८६९४७६२०९**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## पेण तालुक्यासह ग्रामीण भागात महाशिवरात्री उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न



**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.१५, पेण (रायगड) :** पेण शहरात विश्वेश्वर गोटवेश्वर, पाटणेश्वर, तसेच ग्रामीण भागात व्याघ्रेश्वर, वरसई, वाक्रुळ, फणसवाडी, अशा विविध ठिकाणी महाशिवरात्री उत्सव विविध धार्मिक कार्यक्रम घेत तसेच गावातून पालकी काढून महाशिवरात्र उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला आहे. पूर्व भागातील फणसवाडी, भोगेश्वर, गावात मोठा उत्सव साजरा करण्यात आला तसेच वरसई येथे श्री वैजनाथ मंदिरात देखील महाशिवरात्री उत्सव गेली अनेक वर्ष उत्सव साजरा करण्यात येतो. महाशिवरात्री हा भारतातील पवित्र उत्सवांपैकी एक मोठा उत्सव मानला जातो. देशभरात हिंदू धर्मीय लोक महाशिवरात्री मोठ्या उत्साहाने साजरी करत आहेत . महाराष्ट्रातील प्रमुख देवस्थान तसेच इतर विविध ठिकाणी असलेल्या शिवमंदिरात शिवभक्त दर्शनाकरीता मोठ्या प्रमाणात गर्दी करीत आहेत.-वरसई येथील मंदिर पुरातन काळापासून असल्याने दरवर्षी भाविक वैजनाथ स्वयंभू मंदिरात दर्शनासाठी येत असतात. वैजनाथ मंदिरात महाशिवरात्री उत्सव ५ दिवस होत असल्याने कीर्तन, भजन, असे धार्मिक कार्यक्रम करत शिवरात्र उत्सव साजरा करण्यात येतो .

श्री वैजनाथ मंदिर वरसई येथील मंदिर स्वयंभू असल्याने परंपरेनुसार कोणत्याही शिवभक्ताला या शिव मंदिरात ज्या ठिकाणी भगवान शंकराची पिंड आहे त्या गाभाऱ्यात प्रवेश दिला जात नाही. फक्त त्रिपुरा पौर्णिमेच्या दिवशी पुरुषांना आणि तेही सोळं आणि धोतर परिधान करून नंतरच या गाभाऱ्यात प्रवेश दिला जातो. महिलांना या गाभाऱ्यात प्रवेश दिला जात नाही असे येथील जाणकार मंडळी सांगत आहे.

## महाशिवरात्री निमित्त माथेरानमध्ये ग्रामदैवत पिसरनाथ, शिव मंदिरात भाविकांची मोठी गर्दी



**अक्षराज: चंद्रकांत सुतार**

**दि.१५, माथेरान :** हिंदू धर्मातील अत्यंत पवित्र आणि महत्त्वाचा सण म्हणजे महाशिवरात्री. भगवान शिव आणि माता पार्वती यांच्या पवित्र विवाहदिनाचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या या दिवशी उपवास, रात्रजागरण, अभिषेक, रुद्रपाठ आणि विशेष पूजेचे आयोजन केले जाते. श्रद्धेनुसार या दिवशी केलेली शिवभक्ती विशेष फलदायी ठरते. याच पार्श्वभूमीवर माथेरानमध्ये महाशिवरात्री मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात साजरी करण्यात आली. माथेरानचे ग्रामदैवत असलेल्या पिसारनाथ मंदिर येथे सकाळपासूनच भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. पहाटेपासून अभिषेक व विशेष पूजेचे आयोजन करण्यात आले होते. मंदिर परिसर 'हर हर महादेव'च्या जयघोषाने दुमदुमून गेला होता. स्थानिक नागरिकांसह पर्यटकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शन घेतले.तसेच शहरातील ऐतिहासिक शिव मंदिर माथेरान येथेही दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले.

१८व्या शतकापासूनची परंपरा लाभलेल्या या सुमारे दीडशे वर्षांहून अधिक इतिहास असलेल्या मंदिरांमध्ये सकाळपासूनच भाविकांनी दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. पिसारनाथ मंदिर ट्रस्टच्या वतीने विधिवत अभिषेक व महापूजेचे आयोजन करण्यात आले. दरम्यान, शिव मंदिर येथे शिवभक्त ग्रुप आणि शिव मंदिर चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने शिवअभिषेक पूजेचे आयोजन करण्यात आले. भाविकांनी शिवलिंगावर दुग्धाभिषेक, बेलपत्र व फुले अर्पण करून आपली श्रद्धा व्यक्त केली.महाशिवरात्री निमित्त वाढलेली भाविक व पर्यटकांची गर्दी लक्षात घेता माथेरान पोलिसांकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. सायंकाळी ७ वाजता पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि जयघोषात पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. या सोहळ्यामुळे संपूर्ण शहरात उत्सवाचे वातावरण अधिकच रंगतदार झाले आहे. एकंदरीत, यंदाची महाशिवरात्री माथेरानमध्ये पारंपरिक पद्धतीने, मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावात साजरी झाली असून मंदिर परिसर दिवसभर गजबजलेला होता.

## महाशिवरात्रीनिमित्त श्री क्षेत्र सोमेश्वर येथे भाविकांची गर्दी

### 'हर हर महादेव'च्या जयघोषाने परिसर दुमदुमला



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.१५, पालम (परभणी) :** महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर पालम शहरापासून अवघ्या ५ किमी अंतरावर असलेल्या श्री क्षेत्र सोमेश्वर येथे गोदावरी नदीच्या विस्तीर्ण काठावर वसलेल्या या प्राचीन सोमनाथ मंदिरात सकाळपासूनच भक्तीचे वातावरण पाहायला मिळाले. यादरम्यान पवित्र गोदावरी नदीमध्ये स्नान करून अभिषेक करण्यासाठी व दर्शनासाठी भाविक भक्तांची गर्दी दिसून आली, यावेळी हर हर महादेवाच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेल्याने भक्तिमय व उत्सहित वातावरण दिसून आले. दरवर्षीप्रमाणे यंदाही महाशिवरात्रीनिमित्त सोमेश्वर संस्थानाच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. वारकरी संप्रदायातील नामवंत महाराज मंडळींच्या उपस्थितीत पार पडलेल्या कीर्तन आणि जागर सोहळ्याने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. टाळ-मृदंगाचा गजर आणि 'हर हर महादेव'च्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला. दिवसभर चाललेल्या या उत्सवामुळे सोमेश्वर परिसरात जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. गोदावरीच्या काठावर दर्शनासाठी झालेली ही गर्दी सोमनाथ देवावरील अढळ श्रद्धेची साक्ष देत होती.

**तरुणांचा सामाजिक पुढाकार**

दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी श्री क्षेत्र सोमेश्वर येथील तरुण मंडळांच्या वतीने पहाटेपासूनच भाविकांसाठी फराळाची आणि पिण्याच्या पाण्याची उत्तम सोय करण्यात आली होती. शिस्तबद्ध नियोजनामुळे भाविकांना सुखकर दर्शन घेता आले.सोमेश्वर येथील स्थानिक तरुण मित्र मंडळाच्या वतीने सकाळपासून रक्तदान शिबिर घेण्यात आले यावेळी तरुणांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान केले यावेळी हुजूर साहेब ब्लड बँक परभणी च्या वतीने रक्त संकलन करण्याचे काम शंकर मोरे यांनी काम पाहिले. यावेळी स्थानिक गावकरी व तरुणांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

## अज्ञानाचा अंधकार मिटवून ज्ञानाचा प्रकाश पसरवणे हीच खरी महाशिवरात्री - ब्रह्माकुमारी संगीता दीदी

*** चनकापूर येथे महाशिवरात्री उत्सव उत्साहात**

*** शिवध्वजारोहण आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी वेधले लक्ष**





**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१५, नागपूर :** प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरी विश्व विद्यालय, चनकापूर (खापरखेडा) सेवा केंद्राच्या वतीने १५ फेब्रुवारी रविवारला महाशिवरात्रीचा पावन पर्व भक्तीमय वातावरणात उत्साहात साजरा करण्यात आला. परमात्मा शिवाचे अवतरण हे मानवी जीवनातील विकारांचा नाश करून सत्ययुगी पावन सृष्टी स्थापन करण्यासाठी आहे असा महत्त्वपूर्ण संदेश याप्रसंगी देण्यात आला.

कार्यक्रमाला मुख्य मार्गदर्शन करताना ब्रह्माकुमारी संगीता दीदी म्हणाल्या महाशिवरात्री हा केवळ एक सण नसून तो निराकार भगवान शिवाच्या धरेवरील अवताराचा स्मृतीदिन आहे. कलियुगाच्या घोर अज्ञानामध्ये जेव्हा मानवी मूल्ये रसातळाला जातात, तेव्हा शिव परमात्मा ज्ञानाचा प्रकाश पसरवण्यासाठी अवतरित होतात. काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार या पाच विकारांचा त्याग करून राजयोगाच्या माध्यमातून आत्म्याला शुद्ध करणे हेच महाशिवरात्रीचे खरे व्रत आहे. शिव हे कोणतेही भौतिक शरीर नसून ते 'ज्योतिर्लिंगम' अर्थात प्रकाशाचे निराकार बिंदू आहेत.

उत्सवाचे औचित्य साधून सेवा केंद्रावर शिव ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी उपस्थितांनी द्वीप प्रज्वलन करून आपल्या जीवनातील वाईट सवयी सोडण्याचा आणि शुभ संकल्पांचा स्वीकार करण्याची प्रतिज्ञा घेतली. चिमुकल्या मुलींनी सादर केलेल्या शिवस्तुतीपर नृत्यांनी उपस्थितांची मने जिंकली.

आध्यात्मिक सोहळ्याला परिसरातील अनेक मान्यवरांनी हजेरी लावली. याप्रसंगी नागपूर जिल्हा परिषदेचे माजी सदस्यगण अशोक तादूळकर, प्रकाश खापरे, किशोर मुसळे, पोटा (चणकापूर) माजी सरपंच पवन धुर्वे, माजी उपसरपंच रिंकू सिंग, कपिल वानखेडे, विश्वजीत सिंग, डॉ. ओंकार केळवदे, विष्णू बाबुल, हरीश चौधरी, आनंद श्रीवास्तव, वंदना बेले, आरती सावरकर, कामा ढोले आदींचा समावेश होता.

कार्यक्रमाचे संचालन ब्रह्माकुमारी सपना दीदी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चनकापूर सेवा केंद्रातील सर्व ब्रह्माकुमारी बंधू-भगिनींनी अथक परिश्रम घेतले.

## पोलीस भरती प्रक्रियेत वापरल्या जाणाऱ्या सेन्सरची तपासणी करा : आ. मुनगंटीवार

### तांत्रिक बिघाडाचा फटका सक्षम उमेदवारांना...



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१५, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर येथे सुरू असलेल्या पोलीस भरती प्रक्रियेत १०० मीटर धावण्याच्या परीक्षेदरम्यान वापरल्या जाणाऱ्या सेन्सरमध्ये तांत्रिक बिघाड असल्याच्या तक्रारींची लगेच दाखल घेत पोलिस अधीक्षक यांना पत्र लिहून लक्ष वेधले. या धावण्याच्या परीक्षेत वापरलेल्या सेन्सरमध्ये तांत्रिक अडचणी असल्याने अनेक सक्षम व सुदृढ उमेदवारांना १५ पैकी केवळ ४, ६ किंवा ८ असे अत्यल्प गुण मिळत असल्याचे आ. सुधीर मुनगंटीवार यांनी निदर्शनास आणून दिले. पोलिस अधीक्षकांनी याची तात्काळ तपासणी करावी अशा सूचना आ. मुनगंटीवार यांनी दिल्या आहेत. याशिवाय धावण्याच्या प्रारंभबिंदूवर सेन्सर बसविण्यात आलेला नसल्याचीही माहिती उमेदवारांकडून मिळत आहे. त्यामुळे वेळ मोजण्यात अचूक मोजमाप होत नसून उमेदवारांमध्ये संभ्रम व नाराजीचे वातावरण तयार झाले आहे. इतर जिल्ह्यांमध्ये पोलीस भरतीदरम्यान उमेदवारांना १५ पैकी १३ ते १५ गुण मिळत असल्याचे दिसून येत असताना, चंद्रपूरमध्ये तुलनेने अत्यल्प गुण मिळत असल्याने स्थानिक उमेदवारांमध्ये असंतोष वाढत असल्याचे आ.मुनगंटीवार यांनी पत्रात नमूद केले आहे.

या पार्श्वभूमीवर सदर प्रकरणाची तातडीने निष्पक्ष तपासणी करून धावण्याच्या परीक्षेत वापरला जाणारा सेन्सर तपासावा, आवश्यक असल्यास बदलावा, तसेच प्रारंभबिंदूवरही सेन्सर बसवून धावण्याचे अचूक मोजमाप सुनिश्चित करावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी निगडित हा अत्यंत संवेदनशील विषय असून कोणत्याही उमेदवारावर अन्याय होणार नाही, याची प्रशासनाने विशेष काळजी घ्यावी, असेही आ. सुधीर मुनगंटीवार यांनी पत्रामध्ये अधोरेखित केले आहे.

**उमेदवारांनी मानले आभार...**

आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या सूचनेनुसार त्यांचे स्वीय सहाय्यक सतीश जोशी, लक्ष्मण शेंडे यांनी पोलिस अधीक्षक कार्यालयात निवेदन सादर केले. यावेळी उमेदवारांच्या शिष्टमंडळासोबत आ. सुधीर मुनगंटीवार यांनी दूरध्वनीवर संवाद साधत कोणत्याही उमेदवारावर अन्याय होणार नाही, असे आश्वासन दिले. पोलिस अधीक्षक मूमक्का सुदर्शन हे नागभीड दौऱ्यावर असल्याने एसडीपीओ चौगुले यांनी निवेदन स्वीकारले. तसेच पोलिस अधीक्षकांनीही उमेदवारांच्या प्रतिनिधींशी दूरध्वनीवर चर्चा करून पूर्ण खबरदारी घेण्याचे आश्वासन दिले. यावेळी उमेदवारांनी हे प्रकरण गांभीर्याने लक्षात घेतल्याबद्दल आ. मुनगंटीवार यांचे आभार मानले.

## मुंबईकरांचा प्रवास आरामदायी होणार ; मुंबई लोकलचा चेहरा मोहराच बदलणार



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१५, मुंबई :** मुंबईची ओळख म्हणजे धावती लोकल. रोज कामावर, शिक्षणासाठी किंवा व्यवसायासाठी जाणाऱ्या लाखो लोकांचे आयुष्य या रेल्वेवर अवलंबून असते. सकाळ-संध्याकाळ गर्दी, उष्णता आणि प्रवासातील त्रास सहन करत मुंबईकर प्रवास करतात. मात्र आता या दैनंदिन प्रवासात मोठा बदल दिसणार आहे. उपनगरी मार्गावर लवकरच आधुनिक वंदे मेट्रो एसी लोकल धावणार असून प्रवाशांना अधिक आरामदायी आणि सुरक्षित प्रवासाचा अनुभव मिळणार आहे. त्यामुळे मुंबईच्या लोकल सेवेच्या नव्या युगाची सुरुवात होण्याची चिन्हे दिसत आहेत.

दरम्यान मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशनने अत्याधुनिक लोकल गाड्यांसाठी निविदा प्रक्रिया सुरू केली आहे. एकूण २३८ नवीन रेक्स तयार करण्याची योजना आहे. या गाड्या विशेष डिझाईन, आधुनिक सुविधा आणि आरामदायी प्रवास लक्षात घेऊन तयार केल्या जाणार आहेत.

एमयूटीपी फेज ३ आणि ३एअंतर्गत तब्बल २८५६ नवीन डबे प्रवासी सेवेत आणले जाणार आहेत. यासोबत पुढील ३५ वर्षे देखभाल व्यवस्था निश्चित करण्यात येणार आहे. यामुळे सेवा खंडित होण्याचे प्रमाण कमी होईल आणि ट्रेनची गुणवत्ता कायम राखली जाईल.

**प्रवाशांसाठी आरामदायी सुविधा**

या वंदे मेट्रो लोकलमध्ये इंटर-कार गँगवे असल्याने एका डब्यातून दुसऱ्या डब्यात सहज जाता येईल. त्यामुळे गर्दीचे योग्य नियोजन करता येईल. उभे राहण्यासाठी अधिक मोकळी जागा, आरामदायी कुशन सीट्स आणि दिव्यांग तसेच व्हीलचेअर वापरणाऱ्यांसाठी राखीव जागा देण्यात येणार आहे.

नवीन ट्रेनमध्ये मोठ्या काचा असलेल्या खिडक्या असतील. त्यामुळे प्रवाशांना बाहेरील परिसर स्पष्ट दिसेल आणि बंदिस्तपणाची भावना कमी होईल. आकर्षक लूकमुळे ही लोकल शहराच्या आधुनिक प्रतिमेला साजेशी ठरेल.

**मुंबई लोकल प्रवासात नवे पर्व**

नवीन एसी लोकलमुळे प्रवास अधिक सुरक्षित, स्वच्छ आणि आरामशीर होईल. गर्दी नियंत्रण, चांगली हवा आणि सोयीस्कर सुविधा यामुळे दररोजच्या प्रवासातील थकवा कमी होईल. आगामी काळात मुंबईकरांचा प्रवास अनुभव मोठ्या प्रमाणात बदलणार असून लोकल सेवा खऱ्या अर्थाने आधुनिक होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.

## दिघाशी विद्यालयात शैक्षणिक साहित्य व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.१५, शहापूर (ठाणे) :** मुंबईतील जॉय ऑफ गिव्हिंग ह्या सामाजिक संस्थेच्या वतीने शनिवारी ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील दिघाशी ह्या गावातील कै विठ्ठल अमृत पाटील विद्यालय ह्या आदिवासीबहुल शाळेतील इयत्ता ५ वी ते १० वीच्या वर्गांमध्ये शिकणाऱ्या २५० विद्यार्थ्यांना शैक्षणिक व जीवनावश्यक वस्तूंचे तसेच संगणकाचे वाटप करण्यात आले. यावेळी जॉय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गणेश हिरवे, समन्वयक वैभव पाटील, असूंता डिसोझा, मिना भुतकर, भूषण मुळे, निलेश घोडविंदे, वज्रेश्वरी आरोग्य केंद्राचे आरोग्य सेवक डॉ प्रभाकर भोईर तसेच सा वृत्तप्रकाशचे संपादक मनीष वाघ आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच शाळेचे मुख्याध्यापक गुरुदत्त पाटील, सहशिक्षक माधुरी भोईर, राजेंद्र भोईर, ज्ञानेश्वर पाटील, रुचिता पाटील, रामू बेंदर, स्वप्नाली पाटील, शोभा मढवी तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी प्रकाश कामडी, मनोज गायकवाड, रसिका न्हानवे आदी उपस्थित होते. मुख्याध्यापक गुरुदत्त पाटील यांनी शाळेच्या कामगिरीचा लेखाजोखा मांडत शाळेतील मुलांची प्रगती विषद केली. गणेश हिरवे यांनी जॉय संस्थेच्या कार्याची माहिती देत उपक्रमाच्या अयोजनामागील उद्देश स्पष्ट केला. वैभव पाटील यांनी जॉयने ठाणे, पालघर, रायगड भागात राबवलेल्या विविध उपक्रमांची माहिती देत ग्रामीण भागातील शाळांची वस्तुस्थिती उपस्थितांसमोर मांडली. तसेच जॉयच्या ह्या उपक्रमातून सामाजिक बांधीलकीचा संदेश देण्याचा उद्देश असून मुलांनीदेखील भविष्यात स्वतःच्या पायावर उभे राहिल्यावर गरीब, गरजू, दुर्लक्षित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी यथाशक्ती योगदान देण्याचे आवाहन पाटील यांनी केले. निलेश घोडविंदे यांनी शासनाच्या १०८ ह्या आपत्कालीन टोल फ्री नंबर व एप्लिकेशनबद्दल माहिती उपस्थितांना दिली. डॉ प्रभाकर भेरे यांनी आरोग्य विभाग राबवत असलेल्या सिकल सेल व हत्तीरोग निर्मूलन कार्यक्रमाविषयी जनजागृतीपर माहिती देत उपस्थितांना आरोग्याबाबत जागरूक राहण्यासाठी प्रात्यक्षिकांसह टिप्स दिल्या. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या बहारदार स्वागतगीताने झाली. बँड आणि लेझीमच्या गजरात मुलांनी पाहुण्यांचे स्वागत केले. यावेळी मुलांनी बनवलेल्या खास कागदी पुष्पगुच्छानी उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. सर्व शिक्षकवृंदाला यावेळी जॉयचे वैभव पाटील यांनी स्वलिखित पुस्तकभेट देऊन सन्मानित केले. ग्रामीण भागातील गरजू, आदिवासी व वंचित विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जॉय संस्थेमार्फत सभासदांच्या व हितचिंतकांच्या आर्थिक योगदानातून ग्रामीण भागात सातत्याने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. ठाणे, पालघर, रायगड येथील दुर्गम भागातील अनेक शाळांमध्ये गरजू, आदिवासी मुलांना संस्थेमार्फत शैक्षणिक व जीवनावश्यक वस्तू तसेच संगणकांची भेट दिलेली आहे. जॉय संस्थेच्या कार्यामध्ये नेहमीच सढळ हस्ते मदत करणारे जॉयचे सर्व पदाधिकारी, सभासद यांचे त्यांच्या या उपक्रमातील बहुमुल्य योगदानासाठी संस्थेचे अध्यक्ष गणेश हिरवे यांनी आभार मानले आहेत. विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक प्रगतीत हातभार लावण्यासाठी जॉय संस्था यापुढेदेखील नेहमीच प्रयत्नशील राहणार असल्याचे जॉय समन्वयक वैभव पाटील स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र भोईर तर आभार प्रदर्शन ज्ञानेश्वर पाटील यांनी केले.

# मुलुंड मेट्रो पिलर अपघात प्रकरणी कारवाईला वेग...



## ५ अधिकाऱ्यांना अटक अन् कंपनीवर गुन्हा दाखल

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१५, मुंबई :** मेट्रोचा स्लॅब कोसळल्याने मुंबई फिरायला आलेल्या उत्तर प्रदेशातील एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. तर तीन जन जखमी झाले आहेत. दरम्यान या अपघात प्रकरणी कारवाईला आता वेग आला असून पाच अधिकाऱ्यांना अटक अन् कंपनीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच मिलन रोड बिल्डटेक या रिलायन्स अस्तालदी कंपनीच्या कंत्राटदारावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात प्रोजेक्ट डायरेक्टर हरीश चौहान, प्रोजेक्ट मॅनेजर कुलदीप सपकाळ, डेप्युटी मॅनेजर सौरभ सिंह, सुपरवायर प्रशांत भोईर आणि अवधूत इनामदार यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कंपनीला ५ कोटींचा दंडअवधुत इनामदार हे डीबी हिल एलबीजी कंपनीशी सबंधित असल्याची माहिती आहे. मुलुंड दुर्घटनेला जबाबदार धरत एक्झिक्युटिव्ह इंजिनियर सत्यजीत साळवे यांचं निलंबन करण्यात आलं आहे. तसे आदेशच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दिले आहेत. मेट्रो ब्रीज मार्गाचे सेफ्टी आणि स्ट्रक्चरल ऑडिट करावं असे निर्देश एकनाथ शिंदेंनी दिले आहेत. मेट्रो मार्गाचं बांधकाम करणाऱ्या लुई बर्गर कंपनीला एक कोटींचा दंड तर अपघाताला जबाबदार असणाऱ्या मिलन इंफ्रा कंपनीला पाच कोटींचा दंड ठोठावण्यात आला आहे. तर एमएमआरडीएकडून मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना १५ लाखांची आर्थिक मदत जाहीर करण्यात आली आहे.

मुलुंडमध्ये एलबीएस रोडवर वडाळा ते कासारवडवलीच्या मेट्रोच्या बांधकामाचा स्लॅब कोसळल्यानं मोठी दुर्घटना घडली. यामध्ये एकाचा मृत्यू झाला असून ३ जण जखमी झालेत. तसंच तीन वाहनं स्लॅबखाली दबली गेली. रामधन यादव असं मृत व्यक्तीचं नाव असून ते उत्तर प्रदेशचा रहिवासी होते. मुंबई फिरण्यासाठी आले असता त्यांचा अपघाती मृत्यू झाला.

जॉन्सन अँड जॉन्सन कंपनीजवळ सुरू असलेल्या मेट्रोच्या कामावेळी हा स्लॅब कोसळला. एलबीएस रोडवरून ठाण्याकडून मुंबईकडे जाणारी वाहतूक या अपघातानंतर बंद करण्यात आली होती. एमएमआरडीए या संपूर्ण मेट्रो मार्गाचं बांधकाम करत आहे. वेगवेगळ्या चार टप्प्यांचे चार वेगवेगळे कंत्राटदार आहेत. ज्या टप्प्यात हा अपघात झाला तिथलं बांधकाम टाटा प्रोजेक्टस लिमिटेड आणि चायना हार्बर इंजिनिअरिंग कंपनीकडे आहे.

दरम्यान, या अपघातानंतर बंद करण्यात आलेला एलबीएस मार्ग तब्बल ७ तासांनी पुन्हा वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. याप्रकरणी पाच जणांना अटक करण्यात आली असून मुलुंड पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे.

मुंबई फिरायला आले अन् काळाने घाला घातला. दुर्दैवाने, या घटनेत मुंबई फिरण्यासाठी आलेले उत्तर प्रदेशातील रामधन यादव यांचा या दुर्घटनेत मृत्यू झाला आहे. रामधन यादव हे उत्तर प्रदेशातील जौनपूरमधील एका गावाचे सरपंच म्हणून काम पाहत होते. ते मित्रासोबत मुंबई फिरण्यासाठी आले होते. कळव्यात एका लग्नासाठी रामधन यादव आणि महेंद्र यादव रिक्षानं निघाले होते. त्याचवेळी मेट्रोचा सिमेंट ब्लॉक रिक्षावर कोसळला.

मुंबई फिरल्यानंतर दोन दिवसात रामधनी यादव उत्तर प्रदेशात जाणार होते. या घटनेची माहिती मिळताच रामधन यादव यांच्या कुटुंबीयांनी रुग्णालयाबाहेर एकच हंबरडा फोडला.

# ३०० वर्षे पुरातन महाशिवलिंग स्थळी १०८ दांपत्यांच्या हस्ते महाआरती

## चंद्रपूरच्या धार्मिक वैभवात भर घालणाऱ्या स्थळाच्या विकासाला गती देणार : आ.जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१५, चंद्रपूर :** महाशिवरात्री महोत्सवानिमित्त लालपेठ, भिवापूर वार्ड, येथील सुमारे ३०० वर्षे पुरातन व महाराष्ट्रातील सर्वात विशाल महाशिवलिंग स्थळी आज सकाळी १०८ दांपत्यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. यावेळी आमदार किशोर जोरगेवार सहपत्नीक उपस्थित होते.



वेदमंत्रांच्या गजरात आणि 'हर हर महादेव'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. या प्रसंगी राष्ट्रीय ओबीसी आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर, मनीष महाराज, भाजप नेते अशोक जीवतोडे यांची ही प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आ. किशोर जोरगेवार म्हणाले, महाशिवरात्री हा आपल्या संस्कृतीतील अत्यंत पवित्र आणि श्रद्धेचा सण आहे. ३०० वर्षांची परंपरा लाभलेल्या या महाशिवलिंग स्थळी रुद्राभिषेक करण्याचे भाग्य लाभणे ही आनंदाची बाब आहे.

या ठिकाणचा आध्यात्मिक वारसा जपणे आणि भाविकांना उत्तम सुविधा उपलब्ध करून देणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे.

मागील श्रावण महिन्यात आपण या पवित्र शिवलिंग स्थळी भव्य धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. त्या माध्यमातून अनेक वर्षे भक्तांच्या नजरेआड राहिलेल्या या जागृत आणि अतिशय प्राचीन शिवलिंगाची ओळख राज्यभर पोहोचविण्याचे कार्य घडले. या स्थळाला अपार आध्यात्मिक महत्त्व असून येथे येणाऱ्या प्रत्येक भाविकाला दिव्य आणि समाधानाचा अनुभव मिळतो. श्रावण महिन्यात आयोजित कार्यक्रमास अमृता फडणवीस यांनी उपस्थिती दर्शवून विधीवत पूजा केली होती, ही या स्थानाच्या वाढत्या धार्मिक महत्त्वाची साक्ष आहे.

चंद्रपूरच्या धार्मिक वैभवात भर घालणारे हे स्थान असून, याचा सर्वांगीण विकास करण्याचा आपण संकल्प केला आहे. भाविकांसाठी अधिक सोयी-सुविधा निर्माण करणे, परिसराचा विकास करणे आणि या पवित्र स्थळाचा आध्यात्मिक वारसा जपणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे, असेही ते म्हणाले. महाशिवरात्री निमित्त आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून महाशिवलिंग मंदिर सेवा समिती आणि मित्र संघ क्रीडा मंडळाच्या वतीने येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळच्या महाआरती नंतर मनोकामना पूर्ती महारुद्राभिषेक पार पडला. त्यानंतर विविध भाषिक भजन मंडळांच्या भजन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. उद्या महाप्रसादाने कार्यक्रमाचा समारोप होणार आहे.

# जामखेडमध्ये एम.डी. अंमली पदार्थासह आरोपी जेरबंद; २ लाख २३ हजारांचा मुद्देमाल जप्त

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, जामखेड (अहिल्यानगर) :** अंमली पदार्थ विक्रीवर आळा घालण्यासाठी अहिल्यानगर जिल्हा पोलिसांकडून सुरू असलेल्या विशेष मोहिमेत स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर व जामखेड पोलीस स्टेशन यांनी संयुक्त कारवाई करत एम.डी. (मॅफेड्रॉन) अंमली पदार्थासह एका आरोपीला ताब्यात घेतले असून त्याच्याकडून एकूण २ लाख २३ हजार ४०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



अहिल्यानगर जिल्ह्यात अंमली पदार्थ विक्री करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिले होते. त्या अनुषंगाने अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सचे नोडल अधिकारी पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथक जामखेड पोलीस स्टेशन हद्दीत माहिती संकलन करत असताना गुप्त बातमीदारामार्फत मंगेश हिरामन पवार (वय ३०, रा. कान्होपात्रानगर, जामखेड) हा एम.डी. अंमली पदार्थ विक्रीसाठी जामखेड ते कर्जत रोडलगत वैशाली वुड फर्निचर दुकानासमोर येणार असल्याची माहिती मिळाली.

मिळालेल्या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखा व जामखेड पोलीस स्टेशनच्या पथकाने घटनास्थळी सापळा रचला. संशयित आरोपी मोटारसायकलवर येताच पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन झडती घेतली असता त्याच्या पॅन्टच्या खिशात पांढऱ्या रंगाच्या प्लास्टिक पिशवीत ६.१७ ग्रॅम मॅफेड्रॉन (एम.डी.) अंमली पदार्थ आढळून आला. चौकशीदरम्यान सदर अंमली पदार्थ हा मकसुद बागवान (रा.करमाळा, जि.सोलापूर) यांच्याकडून आणल्याची कबुली आरोपीने दिली असून संबंधित संशयित सध्या फरार आहे. या कारवाईत आरोपीकडून १ लाख २३ हजार ४०० रुपये किमतीचा एम.डी. अंमली पदार्थ व १ लाख रुपये किमतीची मोटारसायकल असा एकूण २ लाख २३ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस हेड कॉन्स्टेबल हृदय घोडके यांच्या फिर्यादीवरून जामखेड पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ८३/२०२६ नुसार गुंगीकारक औषधिद्रव्ये व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ कायदा १९८५ च्या कलम ८(क) व २१(ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास जामखेड पोलीस स्टेशन करीत आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे व उपविभागीय पोलीस अधिकारी प्रविणचंद लोखंडे (कर्जत विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर व जामखेड पोलीस स्टेशनच्या अधिकारी व अंमलदारांनी संयुक्तरीत्या पार पाडली.

# श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय बुलढाणा येथे दहावीचा निरोप समारंभ

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, बुलढाणा :** श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय बुलढाणा येथे वर्ग दहावीचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य श्री कावरे सर प्रमुख उपस्थितीमध्ये शाळेचे प्रभारी पर्यवेक्षक श्री ढोमणे व जुनिअर कॉलेज प्रमुख श्री भोंडे एमसीवीसी प्रमुख श्री पंढरीनाथ वाघ तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. इयत्ता दहावी मध्ये शिकणारे सर्व विद्यार्थी या निरोप समारंभाला उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी




आपल्या मनोगत मधून श्री शिवाजी विद्यालय बुलढाणा येथून त्यांना काय शिकायला मिळाले हे सांगितले. तसेच इयत्ता अकरावी मध्ये सुद्धा या शाळेत शिकायचं आहे. विश्वासाने सांगितले विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षक मंडळींनी कशाप्रकारे विद्यार्थ्यांनी बोर्डाच्या पेपरला सामोरे जायचं आहे. तसेच भविष्यामध्ये एक चांगला विद्यार्थी तसेच नागरिक कसं बनायचं हे सांगितले शेवटी कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेची प्राचार्य श्री कावरे यांनी आपल्या भाषणेतून विद्यार्थ्यांनी आपलं करियर कसं बनवायचं व श्री शिवाजी विद्यालय बुलढाणा विद्यार्थ्यांसाठी नेहमी मार्गदर्शन करत राहील. कार्यक्रमाचे संचालन श्री चव्हाण व आभार प्रदर्शन श्री पालकर यांनी केली कार्यक्रमाचे आयोजन नियोजन सौ.हिंगे यांनी केले कार्यक्रमाची छायाचित्रण श्री वाघ व श्री परिहार यांनी केले.

# थोडक्यात

## कत्तलीसाठी डांबून ठेवलेल्या ६ गोवंशीय जनावरांची सुटका

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई, १ लाख ३० हजारांचा मुद्देमाल जप्त



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१५, अहिल्यानगर :** गोवंशीय जनावरांची अवैध कत्तल रोखण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर यांनी केलेल्या कारवाईत जेऊर (ता. जि. अहिल्यानगर) येथे कत्तलीसाठी डांबून ठेवलेल्या सहा गोवंशीय जनावरांची सुटका करण्यात आली असून आरोपीकडून सुमारे १ लाख ३० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार जिल्ह्यात गोवंशीय जनावरांची कत्तल करणाऱ्या ठिकाणांवर कारवाई करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक महादेव गुट्टे व पथकाने एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन हद्दीत माहिती संकलन सुरू असताना गुप्त बातमीदार मार्फत जेऊर गावाजवळ पार्थ ढाब्याच्या पूर्व बाजूस असलेल्या शेतातील पत्र्याच्या खोलीमध्ये गोवंशीय जनावरे कत्तलीसाठी डांबून ठेवण्यात आल्याची माहिती मिळाली.मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी छापा टाकला असता शासनाने कत्तलीस प्रतिबंध केलेल्या गोवंशीय जनावरांना कोणतीही चारा-पाण्याची सोय न करता अमानुष पद्धतीने डांबून ठेवले असल्याचे आढळून आले. यावेळी पोलिसांनी अबरार अमिन शेख (वय ५७, रा.कसाबवाडा बायजाबाई, जेऊर, अहिल्यानगर) यास ताब्यात घेतले. या कारवाईत आरोपीकडून ६ गोवंशीय जनावरे असा एकूण १ लाख ३० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ११६/२०२६ नुसार महाराष्ट्र पशुसंवर्धन अधिनियम १९७६ चे कलम ११(१)(ई)(ड) तसेच प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम १९६० चे कलम ५ व ९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन करीत आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगरच्या अधिकारी व अंमलदारांनी केली.

## सोलापूरात ९० व्या महाशिवरात्रीनिमित्त भव्य शिवध्वजारोहण उत्सव उत्साहात संपन्न

**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.१५, सोलापूर :** सोलापूर येथील शिवप्रकाश भवन येथे ९० व्या महाशिवरात्रीनिमित्त आयोजित शिवध्वजारोहण उत्सव भक्तिमय वातावरणात व मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक अविनाश पाटील व नगरसेवक संजय कणके उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या संचालिका बी.के सोमप्रभा दीदी होत्या. यावेळी सुजाता दीदी व सदीक्षा दीदी यांच्या हस्ते मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.



आपल्या मनोगतात प्रमुख पाहुण्यांनी संस्थेच्या आध्यात्मिक व सामाजिक कार्याचे कौतुक करून आवश्यक ते सर्व सहकार्य देण्याचे आश्वासन दिले. शिवध्वजारोहण सोहळ्यास ब्रह्माकुमारी परिवारातील शेकडो भाई, बहिणी व माता उपस्थित होत्या. तसेच सोलापूरमधील विविध सेवा केंद्रांच्या बी.के. उज्वाला दीदी, योगिता दीदी, महादेवी दीदी, सदीक्षा दीदी, सुजाता दीदी, सावित्री दीदी व अंजली दीदी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आदित्य भाई, गणेश भाई, ओंकार भाई, शिवशंकर भाई, निरंजन भाई, योगेश भाई आदींनी विशेष परिश्रम घेतले.

## सुपा येथे महाशिवरात्री उत्साहात साजरी



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१५, सुपा (अहिल्यानगर) :** सुपा येथील ओंकारेश्वर मंदिर आणि संगमेश्वर मंदिर या ठिकाणी महाशिवरात्री चा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. पहाटे सकाळी ४ वाजता पवित्र रुद्राभिषेक संपन्न व भगवान शिवांच्या पिंडीवर विधीवत रुद्राभिषेक करून कार्यक्रमाची मंगल सुरुवात करण्यात आली. सकाळी ८ वाजता महाआरती भक्तिमय वातावरणात शिव आरती करून सर्व भक्तांनी हर हर महादेवचा जयघोष केला. आरती नंतर महाप्रसाद खिचडीचा देण्यात आला. उपवासासाठी योग्य असे राजगिऱ्याचे लाडू भक्तांना देण्यात आले. तसेच भक्तांना श्रद्धेने मोफत रुद्राक्षांचे वितरण करण्यात आले. सायंकाळी ८ वाजता शिव आरती भक्तिमय वातावरणात करण्यात आली. मध्यरात्री समारोप रात्री १२ वाजता अंतिम महाआरती करून कार्यक्रमाचा भक्तिभावाने समारोप करण्यात आला. महाशिवरात्रीच्या या पवित्र दिवशी सर्व भक्तांनी मोठ्या उत्साहात व श्रद्धेने सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे नियोजन मोहन कसूटकरयश पवार, ओम पवार, संकेत गायकवाड, प्रज्वल कोल्हे, गणेश ठोंबरे, सतीश जवक, प्रसाद रोकडे, आकाश ढोडा यांनी केले.

## हिंद-दी-चादर कार्यक्रमांतर्गत गुरुद्वारांमध्ये आरोग्य तपासणी शिबिर

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१५, पनवेल :** अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन तसेच राज्यस्तरीय समागम समिती व पनवेल महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमानातून हिंद-दी-चादर - श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम कार्यक्रमाच्या अनुषंगाने महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांसाठी मोफत महा आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन दिनांक १४ फेब्रुवारी २०२६ रोजी नवीन पनवेल व कळंबोली येथील गुरूद्वारा येथे आयोजित करण्यात आले. हिंद-दी-चादर या कार्यक्रमांतर्गत कळंबोली येथील गुरुद्वारा येथे आयोजित करण्यात आलेल्या महा आरोग्य शिबिराचे उद्घाटन पनवेल महापालिकेच्या उपमहापौर प्रमिला पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ.आनंद गोसावी, गुरूद्वारा अध्यक्ष दलजित सिंह, सरचिटणीस मनराज सिंग, सचिव त्रिलोक सिंग, रविशेठ पाटील, डॉ.गणेश नाईक, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका उपस्थित होते. याचबरोबर हिंद-दी-चादर या कार्यक्रमांतर्गत नवीन पनवेल मधील गुरुद्वारा येथे आयोजित करण्यात आलेल्या महाआरोग्य शिबीराचे उद्घाटन महापालिका सदस्य कविता चौतमोल, राजेश्री वावेकर यांच्या हस्ते करण्यात आले.